Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ISSN 2319 - 8508


AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X, Issue - II
May - October - 2022
Marathi / Hindi

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X Issue - II May - October - 2022

MARATHI / HINDI

**Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal
Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.495
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Anukrati Sharma**
Assot. Prof. Management,
University of Kota, Kota.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept. of Commerce
& Management University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. Avhad Suhas Dhondiba**
Assot. Prof. in Economics, Sahakar Maharshi
Bhausaheb Satntuji Thorat College of Arts,
Science & Commerce, Sangamner (M.S.)

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University, Karaikal - 609605.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in
Physical Education and Deputy Director of
Physical Education, Mangalore University.

**Prof. U. B. Mohapatra**
Ph.D. (Nottingham, UK) Director,
Biotechnology Government of Odisha, Odisha
Secretariat Bhubaneswar - 751001, Odisha, India.

**Dr. Bibhuti P. Barik**
P. G. Dept. of Bioinformatics, North Orissa
University Shriramchandra Vihar, Takatpur,
Baripada, Odisha, India, Pin 757003.

**Dr. Vijaykumar Laxmikantrao Dharurkar**
Prof. and Head of Mass Communication and
Journalism, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad - 431004 (M.S.)

**Jatindra K. Sahu**
Ph.D. Assot. Prof. Dept. of Agriculture Engineering
School of Technology Assam University (A Central
University Silchar - 788011] Assam, India.

**Prof. S. D. S. Murthy**
F.N.E.A., Head, Dept. of Biochemistry,
S. V. University Tirupati - 2,
Andhra Pradesh, India.

**Dr. Madhukar Kisano Tajne**
Dept. of Psychology,
Deogiri College, Aurangabad.

**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | गांधी विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. शामराव महादेव लेंडवे** | १-३ |
| २ | भारतीय संविधान : भारतीय लोकशाहीचा पाया<br>**प्रा. अशोक किसन वाकडे** | ४-८ |
| ३ | महात्मा गांधीची सर्वसमावेशक धोरण विशेष संदर्भ : महिला सक्षमीकरण<br>**प्रा. डॉ. अशोक शंकर माने** | ९-१५ |
| ४ | आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रो. डॉ. औदुंबर जोती जाधव** | १५-१९ |
| ५ | भारतातील सुशासनाची वाटचाल व आव्हाने<br>**डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर** | २०-२८ |
| ६ | सेंद्रिय शेती : काळाची गरज<br>**डॉ. गायकवाड डी. एस.** | २९-३३ |
| ७ | महाराष्ट्राच्या सामाजिक परीवर्तनाच्या बदलाचे सुवर्णक्षण...<br>**डॉ. विश्वनाथ महादेव आवड** | ३४-४१ |
| ८ | गांधीजी: स्त्री-पुरुष समानता<br>**घाडगे महेश तानाजी** | ४२-४४ |
| ९ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे भारताच्या राष्ट्र निर्मिती मधील योगदान<br>**प्रा. डॉ. महेश कुमार घाडगे** | ४५-४७ |
| १० | गांधीवादी विचार आणि राष्ट्र उभारणी<br>**प्रा. डॉ. मोहन वसंत शिंदे** | ४८-५१ |
| ११ | १८५७ ते १९४७ मधील भारतीय स्वातंत्र्यातील<br>(१८७१ चा गुन्हेगार जमाती कायदा आणि वडार समाज)<br>**प्रिया गणपत पोवार** | ५२-५७ |
| १२ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषीविषयक योजनांचा आढावा<br>**डॉ. राजेश भिमराव गावकरे** | ५८-६४ |
| १३ | गांधी विचार आणि राष्ट्र उभारणी<br>**प्रा. कोळेकर वनिता अशोक** | ६५-७० |

VOLUME - X, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2022
**GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतातील सार्वजनिक धोरण<br>**डॉ. संजय दगडु क्षीरसागर** | ७१-७६ |
| १५ | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कादंबरी<br>**संतोष अंकुश खंडाळे** | ७७-८० |
| १६ | संत चोखामेळा यांच्या अभंगातील अस्पृश्यतेचे चित्रण<br>**सरगर डी. पी.** | ८१-८४ |
| १७ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सोलापूरचे योगदान<br>**प्रा. श्रीराम नारायण पवार** | ८५-८९ |
| १८ | सुशासन आणि सार्वजनिक धोरण<br>**डॉ. संजय संदिपान चव्हाण** | ९०-९२ |
| १९ | राष्ट्र बांधणीत गांधी विचाराचे महत्व<br>**प्रा. डॉ. वाघुले दत्तात्रय मारुती** | ९३-९६ |
| २० | कोल्हापूरचे थोर स्वातंत्र्यसेनानी देशभक्त डॉ. रत्नाप्पांण्णा कुंभार<br>**प्रा. बाबासाहेब शात्रू पाटील** | ९७-९९ |
| २१ | रणजित देसाई यांच्या 'श्रीमानयोगी' कादंबरीत चित्रित झालेले स्वराज्य: एक कल्याणकारी राज्य<br>**प्रा. राजकुमार श्रीधर पवार** | १००-१०३ |

# CONTENTS OF HINDI


| अ.क्र. | लेख और लेखक के नाम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भूतपूर्व प्रधानमंत्री स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी का राजनीतिक तथा कवि जीवन<br>**डॉ. अनिल प्रभाकर कांबळे** | १-४ |
| २ | उपन्यासकार मुंशी प्रेमचंद के उपन्यासों में बाल मनोविज्ञान<br>**डॉ. दिलीप कोंडीबा कसबे** | ५-११ |
| ३ | हमारे दीपस्तंभ : स्वर्गीय रतनचंद शहा (शेठजी) (राजनीतिक, शैक्षिक, सामाजिक तथा आर्थिक क्षेत्र में योगदान)<br>**डॉ. संजय द. क्षीरसागर**<br>**डॉ. अनिल प्रभाकर कांबळे** | १२-१४ |
| ४ | जयप्रकाश कर्दम की कविताओं में दलित जीवन<br>**प्रा. नवनाथ जगताप** | १५-१७ |
| ५ | समकालीन हिंदी कविता पर गांधी विचारधारा का प्रभाव<br>**प्रा. समाधान शिवाजी नागणे** | १८-२१ |
| ६ | भारत की विरासत राम जन्मभूमी "अयोध्या" का सामान्य पर<br>**प्रा. श्रीराम नारायण पवार** | २२-२४ |

VOLUME - X, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2022
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# ७. महाराष्ट्राच्या सामाजिक परीवर्तनाच्या बदलाचे सुवर्णक्षण...

डॉ. विश्वनाथ महादेव आवड
राज्यशास्त्र विभागप्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

## प्रस्तावना

गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राचे वर्णन राकट कणखर, काटेरी, कोमल भावभक्तिच्या बुद्धीच्या देशा असे केलेले आहे. गडचिरोली पासून गुजरातच्या सीमेला भेटलेल्या तलासरी तळोदा ते उदगीर मुखेड पासून सावंतवाडी पर्यंत खाली कारवार पर्यंत गोविंदाग्रजांचा हा राकट, नाजूक, बुद्धिमान, काटेरी महाराष्ट्र आपल्याला भेटतो. महाराष्ट्र तलवार बहाद्दरांचा तसेच बुद्धिवाद्यांचा देश. डोळस जागरूक प्रबोधनाची असलेला, परस्परांबद्दल आदर बाळगून नव्याला प्रेमाने जवळ करणारा असा समाज. भक्ती मार्गापासून चित्रपट सृष्टी पर्यंत सर्व क्षेत्रात येते पायाभूत काम झाले. येथे मतांचा गलबला दिसतो, वादाच्या मतभेदाच्या तीव्र भावना येथे उठलेल्या दिसतात तसेच भिन्न भिन्न मतांचा आदर केलेला दिसतो.

टिळक, आगरकर, भांडारकर अशा काही भिन्न मतांच्या आदराचा महाराष्ट्र डोळस बनवण्याचे श्रेय संत ज्ञानेश्वरांना द्यायचे की संत वांग्मयाचा मंदिराचे कळस असलेल्या तुकोबांना, सामाजिक क्रांतीचे अग्रदूत असलेल्या महात्मा फुल्यांना की प्राच्यविद्या तज्ञाचे महर्षी भांडारकरांना, शिवगंगा जलाचे पावित्र्य त्याचे एकत्र दर्शन देणाऱ्या नामदार गोखल्यांना कि कर्मवीर भाऊराव पाटलांना महाराष्ट्राचे असे अनेक आधारस्तंभ आपल्यासमोर उभे राहतात त्यांची ज्येष्ठता श्रेष्ठता ठरवता येणे अवघड आहे. तसेच त्यांच्या योगदानाची मोजमाप मोजपट्टी ठरवली जाणे शक्य नाही.

आज मी एकविसावे शतक संपता येत असताना आपले महाराष्ट्र पण संपत आले आहे का अशी शंका काही लोक घेतात, आपले सण, आपले पोशाख, बोलल्या जाणारया पद्धती, वागण्याच्या पद्धती, आपले खाद्य पदार्थ, प्रतिसाद पद्धती, घरांची रचना, मनोरंजनाचे विषय, शिक्षण प्रबोधनाचे विषय आणि मार्ग या सर्वांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूप घ्यायला सुरुवात केली आहे. अशा वेळी आपली महाराष्ट्रीयन अस्मिता तपासून पहावी आपला स्थायीभाव, अस्तित्वाचे अधिष्ठान, आपल्या प्रेरणा, निष्ठा तसेच स्वत्व घडवणाऱ्या शक्ती त्याचे पुनरावलोकन करावे या हेतूने तसेच समाज विकासासाठी आत्म परीक्षण होणे आवश्यक असते त्यातूनच नवीन शब्दांची निष्ठांची दिशा ठरवता येते. याहेतूने शोधप्रबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

अनेक क्षेत्रात देशाला मार्गदर्शन करण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. संस्कृती, भक्तिमार्ग, शिक्षण, उद्योग, सहकार, समाजजागृती, चित्रपट, राजकारण, विचार, गाणी संस्कृती इत्यादी क्षेत्रात महाराष्ट्राने

यापूर्वी नेतृत्व केले आहे असेच नेतृत्व आणखी काही क्षेत्रात करता येईल का या संशोधन हेतूने विषय मांडणी केली आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

भारताच्या सांस्कृतिक व राजकीय नकाशावर एक भाषिक गट म्हणून महाराष्ट्राचा परिचय सातवाहन राजांच्या कालापासून झाला असे मानले जाते. सहाव्या शतकात लिहिलेल्या पाली भाषेतील ग्रंथात मरहट्टे हा प्राकृत भाषेतील उल्लेख आहे, ग्रंथ जरी सहाव्या शतकात लिहिलेला असला तरी ग्रंथात उल्लेख केलेल्या मोगलपुत्त याने महेशमंडल महारठ्ठात धर्मप्रचारक पाठवले तो मोगलपुत्त इ स पूर्व तिसऱ्या शतकात होऊन गेला. या महेशमंडळाच्या सीमा उत्तरेस नर्मदा, पश्चिमेस कोकण दक्षिण, उत्तर कानडा अशा होत्या. ज्या काळात सातवाहनांची सत्ता सुरू झाली ते तापी पासुन तुंगभद्रे पर्यंत साम्राज्य प्रस्थापित करणारे ते पराक्रमी राजे व राजकुल महाराष्ट्रीयन असावे असे अनेक पुराव्यांनी सिद्ध झालेले आहे. या सर्व प्रदेशात एकच संस्कृती, एकच भाषा होती ती म्हणजे महाराष्ट्र प्राकृत. महाराष्ट्राच्या अस्तित्वाची सुरुवात या कालखंडात मांडली असली तरी आजचे महाराष्ट्र पण गेल्या सव्वा दोन हजार वर्षांचा कालखंड घडले आहे हे मान्य केले पाहिजे.

सातवाहनाच्या अस्तानंतर ज्ञानेश्वरांच्या कालखंडापर्यंत महाराष्ट्र देशी नोंद घेण्यासारखे असे काही घडले नाही. ज्ञान आणि पराक्रम या क्षेत्रात अंधकार युगच अस्तित्वात होते. पुढील काळात प्रगतीचे अंकुर काही ठिकाणी उगवलेले दिसतात. सातवाहनांची राजधानी पैठण सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होती ती याच काळात कात्रण, व्याकरण आणि महाराष्ट्र प्राकृतातील सप्तशती रचली गेली. कारल्याची आणि भांज्याची लेणी खोदली गेली. वाकाटकांच्या काळात प्राकृत भाषेतील काव्ये लिहली गेली. दहाव्या शतकामधील मराठी भाषेची उत्पत्ती विद्वानांच्या मते इसवी सन अठराशे ते हजार या सुमारास झाली. यादव काळात ११८० मुकुंदराज यांनी मराठीतील पहिला ग्रंथ विवेकसिंधू लिहला. भास्कराचार्य, हेमाद्री, बोपदेव, शारंगधर यासारखी विद्वान माणसे पुढे आली. हेमाद्री बोपदेव यांनी भागवत धर्माची लोकप्रियता वाढवण्यासाठी सहाय्य केले. यादव काळाच्या अखेरच्या काळात मराठ्यांचा पराक्रम मात्र म्यान झालेला दिसतो. परमार्थाच्या नावावर उपभोग घेण्याकडे लक्ष लागले होते. पंचपक्वान्नांचा आस्वाद घेणं या गोष्टी लोकांच्या अंगवळणी पडल्या होत्या. पराक्रमाचे मर्दुमकीचे कामाकडे कोणाकडे वेळ नव्हता.

**संत ज्ञानेश्वर ते शिवरायांचा कालखंड**

गलितगात्र झालेल्या काळात ज्ञानेश्वरांचा उदय झाला. भांबावलेल्या, गोंधळलेल्या, मतभेद आणि चिरफाळलेल्या समाजाला भक्ती भावाच्या शिकवणीने एकत्र आणण्याचे श्रेय संत ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या त्यांच्या नेतृत्वाने प्रभावित झालेल्या उत्तरकालीन संत मंडळाला दिले पाहिजे. महाराष्ट्रातील भक्ती पंथाचे भागवत धर्माचे प्रवर्तक पंढरीचा भक्ति पंत ज्ञानेश्वर पूर्व असला तरी ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांनी भागवत सांप्रदायाला महाराष्ट्रात सर्व स्तरात स्थान प्राप्त करून दिले. भक्ती मार्गाच्या अखेरीचा

अशेरीचा काळाचे वर्णन करतांनाचा कारेरी काळ असे केले जाते. त्याचे कारण की हा काळ केवळ मुघल आमदानीचा होता म्हणून नव्हे, ऐश आरामात राहून आपल्या तलवारी म्यान करून ठेवण्या होत्या नव्हे तर आपला स्वाभिमान आपला पराक्रम वासनात गुंडाळून ठेवून स्वदेशाच्या विचारही मनाला शिवला नाही. मुसलमानी छत्राखाली ओठे व्हावे मांडील की जहागिरी मनसबदारी यात गौरव मानावा. वृत्तिमध्ये प्रतिष्ठा बनवावी. वतनाच्या मोळणातून कुलाभिमानाच्या नावाखाली परस्परांमध्ये वैमनस्य जोपासावा या शिवपूर्व वृत्तीच्या काळाला कारेरी काळच म्हणावे लागेल. या काळाच्या पार्श्वभूमीवर स्वदेश निर्माण करण्याचे श्रेय शिवरायांना जाते.

छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्र धर्म वाढवावा म्हणून श्रीची इच्छेने मराठा राज्य स्थापनेसाठी प्रयत्न केले. छत्रपती शिवरायांच्या राज्यात विचारपूर्वक पर धर्मियांच्या पवित्र स्थानावर हल्ला झाला असे झाले नाही. हे राज्य जरी झोलणाऱ्या जरिपटका भगवा झेंड्याच्या मार्गाने चालत असले तरी ती हिंदू देवस्थानाप्रमाणे अशिंदी दर्गे यांचा सांभाळ या ठिकाणी झाला. खरे तर अशाच पवित्र सहिष्णू महाराष्ट्र धर्माचे प्रतिपालक करण्यासाठी श्रीचे राज्य स्थापन झालेले होते. भक्तिमार्गी यांचा सामंजस्याचा धर्म पुढे चालू करण्यासाठी हे राज्य होते. यापूर्वी या दंडकारण्यात सातवाहनांचे, राष्ट्रकूटांचे, चालुक्यांचे, यादवांचे राज्य होते परंतु नवीन राज्य हे भोसल्यांचे नव्हते ते महाराष्ट्र धर्माचे होते हे या ठिकाणी आपण लक्षात घेणं गरजेचं होतं यातूनच शिवरायांच्या प्रति पालकाच्या भूमिकेत स्पष्टीकरण मिळते. राष्ट्रीय स्वाभिमानाचा आणि अन्याय प्रतिकाराचा मराठ्यांनी निर्माण केलेल्या आदर्शाची मुळे आपल्याला मिळतात.

छत्रपती शिवरायांचे राज्य केवळ तलवारीच्या धारेत चालणारे राज्य नव्हते हे कल्याणकारी राज्य होते शासनाच्या सर्वांगाचा रयतेशी कसा संबंध असावा याची सूचना शिवरायांनी दिल्या आपल्याला दिसतात. विविध पद्धती मध्ये नवीन मार्ग चोखाळले दिसतात. गनिमी युद्ध पद्धती ही काळाची गरज ओळखून त्यांनी ती जोपासली. रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रात शिवाजीने सारे नूतन आज केले असा अभिप्राय मिळतो. यातून पुरुषार्थ पराक्रम शक्ती युक्ती त्याला आवश्यक असणारे गुण निर्माण होतात सामान्य माणसाकडून असामान्य काम करून घेण्याची प्रतिभाही येते कल्याणकारी सहिष्णू पराक्रमी असा महाराष्ट्र शिवरायांनी सुंदर केला.

**शिवोत्तर कालखंड**

शिवकालापासून आताच्या काळापर्यंत महाराष्ट्राचे नेतृत्व कालानुरूप चार विभागात येते सतराव्या व अठराव्या शतकाच्या पहिल्या भागात हे नेतृत्व प्रामुख्याने तलवार बहादुरकडे होते ते 19 व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत तलवार बहादर आणि बुद्धीमतांकडे राहिले. पुढील शंभर वर्षांच्या काळात बहुतांशी उच्च कुलीन आंग्ल विद्याविभूषित वर्गाकडे तर तेव्हापासून आतापर्यंत म्हणजे ब्राह्मणेतर चळवळीपासून सहकार सहकार चळवळ पर्यंत बहुजन समाजाकडे आहे. या चार विभागाच्या सीमारेषा अस्पष्ट आहेत. महाराष्ट्राच्या महाराष्ट्राच्या नेतृत्वाच्या संदर्भात एक गोष्ट नमूद करायला हवी महाराष्ट्राने व्यापार-उद्योग, साहित्य, शिक्षण,

शिक्षण, प्रबोधन, वृत्तपत्र, सिनेमा अशा अनेक क्षेत्रात देशाला नेतृत्व पुरवले आहे. आधुनिक काळातील राजकारणाबद्दल म्हणायचे तर लोकमान्य पासून यशवंतराव चव्हाण पर्यंत ते अगदी कॉंग्रेस पक्षालाच नव्हे तर कम्युनिस्ट समाजवादी, संघ, जनसंघ या सर्वांना राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व दिले.

शिक्षण विषयक सुधारणा

पुढील कालखंडामध्ये शिक्षणाला प्राधान्य देणारी महाराष्ट्राच्या स्वभाववैशिष्ट्येची भूमिका मांडायी लागते. राजकीय चळवळ उभारणाऱ्या महाराष्ट्रीय नेत्यांनी पुढील कालखंडामध्ये शिक्षणाला प्राधान्य देत आपल्या कार्यक्रमात शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे हे त्यांनी जाणले होते. महात्मा फुले, शाहू महाराज, टिळक, आगरकर, महर्षि शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या सर्व समाजसुधारकांनी केलेल्या संस्कारातून विदेशी शिक्षणात विकास नाही हे सत्य समाजात रुजविले सुरुवातीपासूनच इंग्रजी की मातृभाषेतून असा वाद येथे जरूर राहिला नाही. रानडे टिळक यांनी मातृभाषेचे बाजू घेतली करून विविध परंतु विविध शास्त्रांचा शास्त्रांचा अभ्यास युरोप सुधारला त्या शास्त्रांचा अभ्यास त्याच भाषेतून व्हावा ही भूमिकाही येथे मांडली गेलेली आपल्याला दिसते. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना १८९२ मध्ये भारतीय कुलगुरू म्हणून तेलंग यांची नेमणूक याच काळात जांभेकर, आगरकर, शंकर शेठ, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, टिळक आगरकर महात्मा फुले आणि पुढे भाऊराव पाटील यांनी या क्षेत्रात बहुमोल कार्य केले. महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाने बहुजनांचे महत्त्व प्रतिपादन केले गोऱ्यांनी मोफत प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले पुढे 1911 तसा ठरावही इम्पेरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल्स मध्ये त्यांनी आणला.

शैक्षणिक बाबतीतच नाही तर राजकीय गुलामगिरी बद्दल असंतोष निर्माण करणे सामाजिक जाणिवा प्रगल्भ करणं अशा लोकशिक्षणाच्या हेतूने महाराष्ट्रात या काळात अनेक वृत्तपत्रे सुरू झाली. बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी वृत्तपत्र परंपरा महाराष्ट्रात सुरू केली ज्ञानप्रकाश इंदुप्रकाश ही पत्र नंतरच्या काळात महत्त्वाची ठरली न्यायमूर्ती रानडे व सार्वजनिक काकांनी ज्ञानप्रकाशला आपल्या लेखनाने प्रतिष्ठा मिळवून दिली. लोकहितवादीचा प्रभाकर, टिळक आगरकर यांचा केसरी मराठा सुधारक इत्यादी वृत्तपत्रांनी शतकाअखेर महाराष्ट्र जागृतीचे चांगले काम केले. १८८० पर्यंत पर्यंत 34 मराठी व दोन इंग्लिश पत्र या काळात काम करताना आपल्याला दिसतात. धर्मसुधारणा, शिक्षण, वृत्तपत्र, समाजसुधारणा या विविध क्षेत्रात विविध संस्था संघटना यांनी महत्त्वाचे काम केले.

सामाजिक संस्थाचे कार्य

महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधानामध्ये महत्त्वाचे योगदान दिले आहे. अशा संस्था व संप्रदायामध्ये प्रार्थना समाज याचे काम महत्त्वाचे दिसते. आत्माराम दादोबा आणि भास्कर हे तर्खडकर बंधू अग्रगण्य होते. पुढील काळात भांडारकर व न्यायमूर्ती रानडे या समाजास येऊन मिळाले. मूळ चांगले असलेल्या हिंदू धर्मात आयोग्य कर्मकांड शिरले आहेत ती दूर करणे व स्वधर्मात राहूनच पर धर्मातील चांगल्या तत्त्वांचा

तत्त्वांचा अंगीकार करणे यातूनच संबंधित प्रश्न सुट्र शकतील असा विचार पुढे आला. १८७३ मध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली अज्ञानाची जळमटं दूर करून ज्ञान संस्कृती पोहोचवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ब्राह्मो समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन याचाही यामध्ये समावेश करावा लागेल. यापुढील काळात इंग्रज आणि विविध क्षेत्रात पाश्चिमात्य गोष्टी रुजवण्याचा प्रयत्न केल्यानंतर केल्यानंतर पुनरुज्जीवन की नव्याचे स्वागत अशा द्विधा मनस्थितीत असताना महाराष्ट्र असताना ऐतिहासिक संशोधनाची फारच गरज पडली ती सुदैवाने भांडारकर यांसारख्या ऐतिहासिक प्राच्यविद्या संशोधन क्षेत्राच्या माध्यमातून विविध मंडळींनी पूर्ण केली. प्रस्थापितांच्या मानसिकतेला खिंडार पाडून पाश्चिमात्य अभ्यासूंना त्याची योग्यता दाखवून शास्त्रीय विचार पद्धतीने केलेल्या अभ्यासामुळे या काळात संशोधन विविध विचारवंतांचे कार्य विचारात घेणे आवश्यक आहे.

**मतभेद आणि वादविवाद : मनभेद नाहीत**

टोकाचे मतभेद आणि वाद हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य मानावे लागेल. त्याचबरोबर भिन्नभिन्न मताबद्दल आदर राखण्याची प्रगल्भ परंपरा येथे रुजली. टिळक-आगरकर वादातून ही आपल्याला दिसते संमती वयाच्या बाबतीत जो कायदा होऊ घातला होता त्यावेळी भांडारकरांनी हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाहाचे वय व विवाह संबंध यातील टिपण या नावाची इंग्रजी पुस्तके प्रसिद्ध केली त्यातील मते पसंत न पडून तुम्ही तुम्हाला शास्त्राचा अचूक अर्थ लावता येत नसेल तर निदान गप्प राहण्याचा तरी प्रयत्न करा अशी टिळकांनी प्रतिक्रिया व्यक्त केली या टीकेचा समाचार भांडारकर यांनी नेहमीप्रमाणे शांतपणे तसेच शास्त्रशुद्ध पद्धतीने घेतला व केवळ लिहिले कि वेदांमध्ये वाफेचे इंजिन व विद्युत तारायंत्र बघणाऱ्यांच्या पंथात ते आहेत. इतके मतभेद असूनही बंड गार्डन मध्ये गुरुजींना पाहून त्यांचे पाया पडायला सरसावलेले टिळक अनेकांनी पाहिले होते तसेच दक्षिण आफ्रिकेच्या सभेसाठी अध्यक्ष हवा व त्यासाठी भांडारकर यांना विचारावे ही सूचना गांधीजिना टिळकांनी केलेली होती.

**प्रबोधनाचा काळ**

पुढील काळ हा प्रबोधनाचा काळ समजला जातो. पेशवाईच्या अस्तानंतर प्रबोधनाची सुरुवात झाली. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्यायमूर्ती रानडे, भांडारकर, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, अशा महान व्यक्तीने इंग्रजांच्या आगमन संबंधी मध्यमवर्गाला न आवडनारी भूमिका घेतली. इंग्रजांचे राज्य ही परमेश्वराची देणगी आहे अशी काही धारणा होती की धारणा त्यांनी बाजूला सारण्याचा प्रयत्न केला. १८८५ मधील अस्पृश्यांची कैफियत बरेच काही सांगून जाते. भागवतामध्ये अनेक पुरातन मन कल्पिता दंतकथा आढळतात त्यापेक्षा इसापनीती बरी अशी विधानं या काळात केली गेली ब्राह्मणांच्या जन्मसिद्ध श्रेष्ठत्वावर टीका केली, तसेच शब्द प्रमान्यावरही वाद घातला. वेद आणि श्रुती म्हणजे तरी काय चार विद्वान लोकांनी लोकांनी आपल्या समजुतीप्रमाणे ठरवलेले नियम असे ते म्हणत. देशाच्या कारभारासाठी जे पार्लमेंट करायचे आहे त्यात तेली, तांबोळी, कैकाडी, महार, मराठे यांना ही भट ब्राह्मना बरोबर जागा हवी असा

समतेचा आग्रह या काळात धरला गेला. रानड्यांनी या काळात हिंदू प्रकाश मधून सामाजिक समस्या विरुद्ध उठाव केलेला होता पुढील काळात नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली पुढील काळात लोकमान्यांनी राजकीय सत्ता सूत्र आपल्या हातामधे घेतली. लेखनात आक्रमकता होती स्पष्ट स्पष्ट वैचारिक दिशा होती राजकीय गरजांच्या संदर्भात सामाजिक विषयावर लिखाण त्यांनी केले होते आगरकरांचे लिखाण समाज सुधारण्याच्या हेतूनेच व्हायचे टिळकांची परंपरा बद्दलची बांधिलकी आंधळी नव्हती ते पाहिजे तेव्हा ते मत व्यक्त करायचे परंतु लोकांचे मन राजकीय असंतोष यापासून विचलित होऊ होऊ नये व अन्य समस्यांना त्याच वेळी लोकांच्या मनात प्राधान्य मिळू नये असा त्यांचा प्रयत्न होता. नंतरच्या काळात ही समाजसुधारणेची ज्योत बहुजनांपर्यंत दलित संघटनांपर्यंत संस्था बांधून कृतिशीलतिने पुढे नेण्याचे कार्य फुले शाहू आंबेडकर भाऊराव पाटील यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या लेखनातून इथल्या विषम समाजव्यवस्थेचे उपपत्ती सांगितली माणसाचे माणूस म्हणून असलेल्या हक्क त्याला कोणीही कधीही कुठेही नाकारू शकत नाही ही भूमिका त्यांनी मांडली. जातीय निराकरण अस्पृश्यता निवारण आणि स्त्री-पुरुष समतेचा साक्षेपी पाठपुरावा केला. शिक्षण प्रबोधन कायदा व्यवसाय मुक्ती संघर्ष सत्य धर्माचरण अशा धर्म मार्गाचा समताधिष्ठित समाजाच्या प्रतिष्ठापनेसाठी कसा वापर करता येईल याचा सूक्ष्म विचार केला. ईश्वरी संकेत पूर्वकर्म व जन्माचा पावित्र्य या गुलामगिरी घट्ट करण्यासाठी वापरलेल्या कल्पना होत्या त्याविरुद्ध त्यांनी बंड केले. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे असा संदेश तृतीय रत्न या नाटकातून देऊन सामाजिक प्रबोधनाची नांदी केली. शिवाजी महाराजांचा जाती-पाती विरहित समतावादी विचार पोवाड्याच्या रूपाने खेडोपाडी नेला आणि दलित समाजाला जागे करण्यासाठी गुलामगिरी ते सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात जाणीवपूर्वक प्रश्न उत्तराची लेखणी पद्धत वापरली. ज्ञानाचा उगम जिज्ञासा मधून होत असतो हे समजून प्रश्नाद्वारे जिज्ञासा जागृत करावी हा त्यामागील हेतू त्यांनी समजावून सांगितला. शेतकरयांचा असुड मांडताना शेतीच्या आधुनिकीकरणासाठी आग्रह धरला शोषणाविरुद्धी आंदोलने उभारली.

शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेतृत्व

टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात पुढील काळात सामाजिक राजकीय विचारप्रवाह बदलले राष्ट्रीय सभेचे नेतृत्व महात्मा गांधी यांचेकडे आले. महाराष्ट्रातील टिळक पंथीयांचा गांधींच्या नेतृत्वाला विरोध होता होता याच कारणासाठी बहुजन समाजातील ब्राह्मण विरोधी असलेले नेतृत्व काँग्रेसकडे वळाले. टिळक अनुयायी काँग्रेसमध्ये पोरके झाल्यासारखे दिसले. काही काळ मोतीलाल नेहरूच्या स्वराज्य पक्षात राहिले. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना हेडगेवारांनी केली हिंदू महासभेची स्थापना त्यापूर्वी झाली होती 1930 नंतर काँग्रेसमध्ये बहुजन समाजाचे वर्चस्व वाढले गांधी विरोधाचे काँग्रेस विरोधाचे राजकारण हिंदू महासभेद्वारे चालले पुढे सावरकरांनी हिंदू महासभेची सूत्रे हाती घेतल्यानंतर गांधी मुसलमान यांच्याबद्दलचा

यांच्याबद्दलचा विरोध वाढला. याच वेळी ब्राह्मणेतर चळवळीतून बुद्धिमान दूरदर्शी असे नेतृत्व उदयाला आले होते ते म्हणजे डॉक्टर भीमराव आंबेडकर आणि शाहू महाराज यांचे.

समाजिक अस्पृश्य व आर्थिक संकल्पनेच्या आधारे आपली मांडणी करणारा राजर्षी छत्रपती म्हणून महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजाचा नायक या काळात उदयाला येत होते त्यांचे अर्थकारणाच्या सहाय्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व पुढच्या काळात निर्माण झालेले दिसते. बाबासाहेबांच्या समागम व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे अवघडच आहे. सामाजिक कार्यकर्ते, समाज सुधारक, युगपुरुष, विचारवंत, कायदेपंडित, घटनाकार, अर्थतज्ञ इतिहास संशोधक, तत्त्वचिंतक, चिकित्सक लेखक इतक्या अनेक सकल्पनेच्या आधारे आपली मांडणी करणारा बहुजन समाजाचा नायक या काळात उदयाला येत होते. बाबासाहेबांच्या विचारावर ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा पगडा होता. सर्व श्रेष्ठ समाजसुधारक म्हणून त्यांना मान्यता देत होते. समस्या सोडवण्यासाठी शाहू महाराजांची चांगली मदत झाली महाराष्ट्रात किंबहुना सर्व देशभर अस्पृश्यांना सामाजिक दृष्ट्या जागृत करण्याचं श्रेय बाबासाहेबांकडे जाते. जाती अस्पृश्यतेचा संहार करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे त्यांनी म्हटलं मूकनायक, बहिष्कृत भारत साप्ताहिक आणि बहिष्कृत हितकारणी सभा ही संस्था याद्वारे त्यांचे हे काम चालले.

डॉ. बाबासाहेब कट्टर देशभक्त होते परंतु त्यांची राष्ट्राची संकल्पना वेगळी होती त्यांना जे स्वातंत्र्य हवे होते ते सामाजिक स्वातंत्र्य त्यांना जी लोकशाही हवी हवी होती ती सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य इंग्रजी राजवटीपासून नव्हे तर स्वकीय सत्ताधारी वर्गाकडून डॉं आंबेडकर यांचे नेतृत्व, कार्याची उभारणी करण्यामध्ये महाराष्ट्राचाही मोठा वाटा आहे. आजच्या काळात महाराष्ट्र जीवनाच्या अनेक पैलू वर एक अमीट छाप बाबासाहेबांनी पाडलेली आहे हे तितकेच खरे आहे जितके की महाराष्ट्र खेरीज अन्य कोणत्याही राज्यात त्यांचा जन्म झाला असता तर त्यांच्या कार्याला मिळालेले तेवढे यश मिळण्याची शक्यता नव्हती. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर लोकांच्या जागृतीसाठी प्रामुख्याने शाहू आंबेडकर आणि भाऊराव पाटील यांचे फार मोठे योगदान आपल्याला सांगावच लागेल आधुनिक महाराष्ट्राच्या समाजपरिवर्तन मध्ये त्यांचा खूप मोठा हातभार लागला हे आपल्याला या ठिकाणी मान्य करावे लागते.

**निष्कर्ष**

१. भिन्न मतांचा महाराष्ट्र डोळस बनवण्याचे कार्य झाले. टोकाचे मतभेद आणि वाद हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य मानावे लागेल. त्याचबरोबर भिन्नभिन्न मता बद्दल आदर राखण्याची प्रगल्भ परंपरा येथे रुजली आहे.

२. महाराष्ट्रीयन अस्मिता तपासून आपला स्थायीभाव, अस्तित्वाचे अधिष्ठान, आपल्या प्रेरणा, निष्ठा तसेच स्वत्व घडवणाऱ्या शक्ती त्याचे पुनरावलोकन पुढील काळात होणे आवश्यक आहे.

३. समाज विकासासाठी आत्म परीक्षण होणे आवश्यक असते त्यातूनच नवीन शब्दांची निष्ठांची दिशा ठरवता येते. भक्ती मार्गापासून उद्योगभक्ती मार्गापासून उद्योग-व्यवसाय पर्यंत अनेक क्षेत्रात

क्षेत्रात देशाला मार्गदर्शन करण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. संस्कृती, भक्तिमार्ग, शिक्षण, उद्योग, उद्योग, सहकार, समाजजागृती, चित्रपट, राजकारण, विचार, गाणी संस्कृती इत्यादी क्षेत्रात क्षेत्रात क्षेत्रात महाराष्ट्राने यापूर्वी नेतृत्व केले आहे असेच नेतृत्व पुढील काळात काही क्षेत्रात करता येईल येईल का याचा विचार होणे आवश्यक आहे.

४. छत्रपती शिवरायापुर्वी या दंडकारण्यात सातवाहनांचे, राष्ट्रकूटांचे, चालुक्यांचे, यादवांचे राज्य होते परंतु नवीन राज्य हे भोसल्यांचे नव्हते ते महाराष्ट्र धर्माचे होते हे या ठिकाणी आपण लक्षात घेणं गरजेचं

५. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधानामध्ये सामाजिक संस्थानी महत्वाचे योगदान दिले आहे. समाजसुधारणेची ज्योत बहुजनांपासून दलित संघटनांपर्यंत संस्था बांधून कृतिशीलतिने पुढे नेण्याचे कार्य फुले शाहू आंबेडकर भाऊराव पाटील यांनी केले.

६. भांबावलेल्या, गोंधळलेल्या, मतभेद आणि चिरफाळलेल्या समाजाला भक्ती भावाच्या शिकवणीने एकत्र आणण्याचे कार्य संत मंडळींनी केले.

७. राजकीय चळवळ उभारणाऱ्या महाराष्ट्रीय नेत्यांनी पुढील कालखंडामध्ये आपल्या कार्यक्रमात शिक्षणाला प्राधान्य दिले.

संदर्भ

१. महाराष्ट्र गाथा : ह मो मराठे
२. महाराष्ट्रातील samaj सुधारक : वी बी पाटील
३. परंपरा प्रबोधन आणि परिवर्तन : रा ना चव्हाण
४. महाराष्ट्र संस्कृती ; पु ग सहस्त्रबुद्धे
५. महाराष्ट्राची मानचिन्हे : संपादक प्रा. एकनाथ साखळकर , डॉ.सुभाष भेंडे